# निशाण क्र. ३६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी आजरोजी वादी साक्षीदाराचे जबाबाचे शपथपत्र दाखल करत आहेत तरी तत्पूर्वी काही महत्वाचे कागदपत्र दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. सदरचे कागद हे पुराव्याच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने तसेच काही कागद सार्वजनिक कागद आहेत. सबब, ते दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तूत वादी यांनी केली आहे.

२. प्रतिवादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सदर कागदपत्र हे खुप उशिराने दाखल करत आहेत. सदर विलंबाबात कोणतेही कारण नमूद करण्यात आलेले नाही. सबब अर्ज जास्तीत जास्त रक्कमेसह नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांचे तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर कागदपत्र हे वाद विषयाशी संबंधित आहेत असे दिसून येते. सदर दावा हा वाटपाकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत वादी यांना हे कागदपत्र दाखल करण्यास परवानगी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्या सारखे होईल असे वाटते. परिणामी त्यांचे कशानेही भरून न येणारे अपरिमित नुकसान होईल असे वाटते. याउलट अशी

परवानगी मंजूर केल्यास प्रतिवादीचे कसलेही नुकसान होईल असे वाटत नाही. सदर कागदपत्र दाखल करण्यास परवानगी दिल्यास वाद विषयाचे गुणावगुणावर निवारण होण्यास मदतच होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस क्रमप्राप्त आहे असे वाटते. परिणामी खालील आदेश पारीत करीत आहे:

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड ( बी.आर.पाटील )
दिनांक: ०९/०३/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by BALKRISHNA RAJARAM PATIL
Date: 2022.03.10 15:39:44 +0530